
# प्रस्थान

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2332




दत्ता पवार

REFBK-0022115
REFBK-0022115

वि. क्र. 2332
229945

# प्रस्थान

दत्ता पवार

229945
काव्य 2332

REFBK-0022115
REFBK-0022115

साहित्य संवाद प्रकाशन, मुंबई.

प्रथम प्रकाशन : ऑक्टोबर १९७७

मूल्य : पाच रुपये

© सौ. सरोज पवार

प्रकाशक :
प्रकाश बन्द्रे
पांचाळ हाऊस,
डहाणूकर वाडी,
कांदिवली (पश्चिम)
मुंबई—४०० ०६७.

मुद्रक :
नारायण पाटील
आल्प्स प्रिंटिंग प्रेस
२०२, अलंकार इंडस्ट्रियल इस्टेट
आरे रोड, गोरेगाव (पूर्व)

मुखपृष्ठ छपाई :
श्रीगंगाधर प्रिंटिंग प्रेस, दादर.

मुखपृष्ठ/मांडणी :
अरुण वाटे

साने गुरुजींच्या
'साधने'स
समर्पित

ऋणनिर्देश :

कविवर्य वा. रा. कान्त

प्रा. गंगाधर पाटील, प्रा. मधुकर पी. पाटील, रवीन्द्र पिंगे,
अरुण घाटे, माधव कुळकर्णी, प्र. श्री. नेरूरकर,
दिनकर गांगल, प्रकाश बन्द्रे, नारायण बांदेकर.

प्रतिष्ठान, माणूस, स्वराज्य, राजश्री, किर्लोस्कर इ.

साहित्य संवाद
मुंबई

## प्रस्थान ठेवताना

'प्रस्थान' हा प्रा. दत्ता पवार या नवोदित कवीचा पहिला कवितासंग्रह. गेल्या आठ-दहा वर्षांतील आपल्या निवडक कविता यात त्यांनी संग्रहित केल्या आहेत.

ह्या कविता वाचताना, सहजच गेल्या आठ–दहा वर्षांतला मराठी कवितेचा काळ डोळ्यांपुढून सरकला. त्यावेळच्या आणि आजच्या कवितेत फारसा फरक पडला आहे असे नाही. परंतु त्यावेळच्या प्रवाहातील लाटांचा तेव्हाचा जोश व वेग आठवला. आपल्या ताजेपणाने मनात उभा राहिला; आणि वाटलं या कवितेचा विचार त्या संदर्भात केल्यास तिचं आकलन अधिक नेटकं व्हावं.

१९६५ ते १९७५ या कालखंडातल्या काव्याकडं दृष्टिक्षेप केला तर काय दिसतं? या काळात आरती प्रभु, ग्रेस महानोर, सुर्वे प्रभृति कवी आपल्या वैशिष्ट्यानं लक्ष वेधून घेत होते, प्रस्थापित होऊ पाहात होते. या कवींच्या आणि वसंत डहाके, वसंत सावंत, गुरुनाथ धुरी, सुशील, वा. रा. सोनार व दया पवार या कवींच्या उदयापर्यंतच्या, या मधल्या काळात, अनेक कवी कविता लिहित होते. ते सारे कवी वर उल्लेखिलेल्या चार कवींच्या कवितेने विशेष प्रभावित झाले होते. पु. शि. रेगे, विंदा करंदीकर व पाडगावकर यांचाही प्रभाव त्यांच्यावर होताच. परंतु प्रामुख्यानं उपरोक्त, चार कवींच्या शैलीचं ते अंध अनुकरण करीत होते असंच म्हणावं लागेल. कारण हे कवी त्यांना जवळचे होते. त्यांचे विचार, अनुभव ओळखीचे, निकटचे वाटत होते. या कवींच्या प्रतिमानिष्ठ

शैलीनं भारावून तिचा ते अतिरेक करीत होते. खुद्द ग्रेस प्रभृती कवींनीही आपल्या काव्यात बऱ्याच ठिकाणी प्रतिमांचा (मिश्र प्रतिमा, भग्न प्रतिमा इ.) अतिरेकी वापर केला आहे. पण त्या सर्जनात काहीतरी वेगळं निर्माण करण्याचा त्यांचा यत्न होता. त्यांचे पूर्वसुरी पु. शि. रेगे, सदानंद रेगे, मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर आदि कवींनी ह्यापूर्वी ही शैली आशय--आविष्काराच्या पूर्तीसाठी यशस्वीपणे राबवली होती. परंतु या नवीन आलेल्या 'मायनर' ( Minor ) कवींना याच गोष्टीचं भान नव्हतं. आवश्यक-अनावश्यक प्रतिमांची, प्रतिमांची कसली, त्या नावाखाली असंबद्ध पोकळ शब्दांची जंगलं त्यांनी उभी केली. औचित्य, अर्थवत्ता आणि कलात्मक अपरिहार्यता, यांची त्यांनी बूज ठेवली नाही. त्यामुळे या काळच्या काव्यावर एक अवकळा पसरली. तिचा प्रवाह आवर्तात सापडला. असह्य तोचतोपणा जाणवू लागला. आणि प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या शब्दांत सांगायचं म्हणजे 'बिनचेहऱ्याची कविता' मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. याचं कारण असं की वरील कविचतुष्टयाच्या प्रेरणा व त्यांची बलस्थानं यांचं त्यांना खरं आकलन झालं नाही. त्यांच्या बाह्यांगाचं, फक्त शब्दांचं त्यांनी अनुकरण चालू ठेवलं. आरती प्रभूंच्या कवितेनं जीवनाची अर्थहीनता पचवून त्याबरोबरच त्या क्षणातील सौंदर्यही त्याच्या वास्तवासह आत्मसात केलं होतं. विष आणि अमृत एकाच नजरेत घोळणाऱ्या सुंदर डोळ्यांची ती कविता होती. ग्रेसच्या काव्यातील गूढ दुःखाला, अज्ञात आत्म्याच्या आमंत्रणाची ओढ होती, तर महानोरांच्या हिरव्या बोलीत, त्यांनी पाहिलेला, कळीत मुरलेला माणूस रानाच्या मुखानं बोलत होता; आणि सुर्व्यांच्या वाणीत सामूहिक

जाणिवेचा, 'नाहीरे'च्या पोटतिडिकेचा मुलुख मैदानी गडगडाट निनादत होता. आपल्याला आलेले मर्यादित अनुभव, कल्पिताच्या मुशीत ढाळून त्याचं सोनं बनविण्याची काही ताकत या साऱ्या कवींत होती. परंतु त्यानंतरच्या बहुसंख्य कवींनी त्या प्रेरणांची ही शक्ती ओळखली नाही; हस्तगत करण्याचा प्रयत्नही केला नाही. त्यामुळे ते शब्दांतच गुरफटले, वाहावले. अनुभवाला त्यांनी प्रतिमेत चिणून टाकण्याचाच वेडा प्रयत्न केला. परंतु लक्षणीय गोष्ट अशी की, ह्याच सुमारास या पिढीतल्या काही कवींनी हा धोका जाणला होता. प्रतिमेच्या जंगलात भरकटलेल्या कवितेला नेमकेपणाकडं, आशयरूप धारण करणाऱ्या अनुभवाकडं नेण्याचा प्रयत्न त्यांनी सुरू केला. पु. शि. रेगे, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर आदि ज्येष्ठ कवींनी ज्या कलात्मकतेनं प्रतिमेचा उपयोग केला, ती कलात्मकता, ते सामर्थ्य साध्य करून, कवितेला परत नीटस व अर्थसघन रूप देण्याच्या हेतूनं, त्या काळात ते सावधानतेनं काव्यरचना करू लागले होते. म्हणजे एकाच वेळी या दोन्ही प्रकारच्या रचनाप्रक्रिया चालू होत्या. बाहेरून वाङ्मयप्रवाहाची धारा एकमुखी व एकदिक् अशी वाहाताना दिसत असली, तरी वस्तुतः ती तशी नसते. तिच्या अंतरंगात विविध आंतर विरोधी प्रवाह वाहात, उसळत असतात. त्या प्रवाहाचं हे एक स्थूल आलेखन.

अशा प्रकारे सावधानतेने काव्यलेखन करणाऱ्या मंडळीत डहाके, वसंत सावंत, गुरुनाथ धुरी, सुशील इत्यादि कवी कवयित्री उल्लेखनीय आहेत. या कवींच्या अनुगांतच श्री. दत्ता पवार यांची गणना करता येईल. प्रतिमांचा बिनधास्त वापर करणाऱ्या तरुण कवींच्या पिढीतूनच ते पुढे आले आहेत. या बिनधास्तपणाचे काही

चमत्कार त्यांच्या काव्यात आढळतात. काही ठिकाणी 'झडलेल्या अस्थी, त्या अस्थींचे प्रस्तर, त्या प्रस्तरगतल्या चूर्ण मुष्टी आणि त्यांचे पेटणें, अशा अनैसर्गिक कल्पना-प्रतिमा कवितेत डोकावतात. मग आवेशाच्या भरात चूर्ण झालेल्या मुष्टी एकाद्या वेळी आघात करू शकतील पण त्या पेटणार नाहीत, याचंही भान रहात नाही. कुठं काव्यगत आशयाची हानी करणाऱ्या 'लुच्च्या गात्रांच्या गुलाबी' प्रतिमा आढळतात. त्यामुळं काव्याला कृत्रिमता येते. आशयही विकृत होतो. पण अशी स्थळं फार कमी. उलट सातूच्या पिठात लोळणारा महाभारतीय 'मुंगूस,' वासनेत पेटणारा 'कलिंग', अशा सारख्या भव्य प्रतिमांनी, या कवितासंग्रहातल्या क्षुद्र प्रतिमांचे दोष झाकून जातात व एकंदर कवितेला एक उंची लाभते. तसंच या कवीची, प्रतिमा वापरताना, कलात्मक तोल सांभाळण्याची क्षमता अनुभवाने वाढते आहे, असंही जाणवतं.

या संग्रहातल्या कविता चाळताना पहिलं वैशिष्ट्य मला जाणवलं ते हे की, या कवीला कुठं जायचंय ते ठाऊक आहे. या संग्रहाचं नावही या अर्थानं मला सूचक वाटतं.

प्रवासाचा अर्थ पर्यटन, यात्रा असा आपण करीत असलो तरी त्यात 'वास' हा शब्द मुख्य आहे. 'वस्' म्हणजे राहाणं, वसती करणं या धातूपासून तो बनला आहे. प्रवासापेक्षा वसतीला, मुक्कामाला अधिक महत्त्व आहे. याचंच ते सूचक नाही का ? प्रस्थानानं प्रवासाची सुरुवात होत असली तरी एका स्थानाकडून दुसऱ्या स्थानाकडं जाण्याची, स्थानांतराची क्रिया त्यात प्रामुख्यानं अभिप्रेत असते. याचा अर्थ असा की संकेतस्थानाची निश्चिती

ही प्रस्थानामागची खरी प्रेरणाशक्ती आहे. तिथं दिशाहीनतेला वाव नाही. असं नसेल तर ती केवळ भटकंती होईल. ही भटके-गिरी या कवितेत आढळत नाही. प्रस्थानाचं महत्त्व आणि त्याचे धोके हे दोन्ही या कवीला माहीत आहेत. तुकारामाची गाथा रद्दीत विकली जाते, हे सत्य तो उघड्या डोळ्यांनी पाहातो आणि आपले शब्द आपल्याच संवेदना उद्या बाजारबुणग्यांना विकायला तयार होतील, याचीही त्याला कल्पना आहे.

‘ भविष्याच्या वाटेवर । संदर्भ शोधीत
मन दुभंगून गेले ’

असं हा कवी म्हणतो. भविष्याच्या वाटेवर हे दुभंगलेपण का भोगावं लागतं आणि शोधू घातलेले हे संबंध कसले आहेत, याची काहीशी कल्पना त्यांच्या कवितेवरून येते. ‘ गर्दीच्या तळघरात ’, ‘ रक्तातील कमळ ’, ‘ तुझे उसवलेले आकाश ’, ‘ प्रकाशराईत ’, ‘ मरणगुहा ’ इ. कवितांमधून या दुभंगलेपणामागील अनुभवांची चाहूल लागते. सर्वसामान्य जीवनातली ही दुःखं आहेत. ध्येयांची, स्वप्नांची धूळधाण; प्रेमाची, विश्वासाची वंचना; मूल्यांचा अधःपात, माणुसकीचं मरण आणि या सर्व आघातांनी होणारी मनाची कुचंबणा यांची व्यथा या कवितेत सशब्द होते. ‘ आत्म्याचं लाकूड ’ करून जे पराभव पचवावे लागतात त्याची ही वेदना आहे. जिथं ‘वरातीमधला घोडा कुठल्या तरी अश्वमेध यज्ञात मरून पडतो, ’ अशा विसंगतीचंही हे दुःख आहे. ध्येयवादी जीवनाची विकलताही वेगळ्या अंगानं इथं व्यक्त होते. स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्यांना प्रत्यक्षात कधी कधी खऱ्या स्वातंत्र्याच्या कल्पनेचाच विसर पडतो. माणुसकीच्या कळ्यात

माणूसच हरवून जातो. ही वस्तुस्थिती भयंकर आहे.

‘ इथल्या उंदरांनी
कुरतडलेल्या जगात
माणूस नावाचा प्राणी हरवला आहे.
प्लेगच्या पिसवा बनून
त्याचा शोध करावा लागेल ’

मनाच्या या भयानक विध्वंसक अवस्थेत, ‘ओठावरला शब्दांचा अवधूत’ अंधारात वेदनेने चित्कारतो. अस्तित्वाच्या निषेधाचा तो चित्कार असतो. वाटेत सोबतीचा उबग येतो. त्यापेक्षा वाटेवरचे मैलाचे दगड बरे वाटायला लागतात. ‘हे जीवन मरणगुहा नित्यनूतन पर्णाला’ असाच अनुभव अटळपणे येतो. जे दिसतं ते सगळं भयाण, मरणाधीन व अर्थहीन आहे हेच सत्य, असा प्रत्यय पदोपदी येतो. तरीही कवीचं जीवनावरील प्रेम, सौंदर्याची ओढ कमी होत नाही. या क्षणभंगुर सुंदर जीवनाचं दर्शन गुहेतल्या जीर्ण पानालाही पुन्हा टवटवीत करतं; त्यात त्याला नवीन अर्थ दिसतो—

‘ लाल काळी करवंदे । आली कशी फुलून
पानांच्या काचोळीत । मेघ आले भरून ’

‘ खिडकीतल्या फांदीवर ’, ‘सकाळताना’, ‘प्रश्नांकित अंधार’ या कवितांतून प्रीतीचे—सौंदर्याचे हे नाजुक साजुक अनुभव शब्दांकित झाले आहेत. ‘ प्रश्नांकित अंधार ’ या कवितेतील प्रीतीचा अनुभव तर उत्कट आणि व्यथासंकुल आहे. प्रेम आणि वासना

यांच्या संघर्षात वासनेला शरण जाणाऱ्या जिवाची तडफड मोठ्या व्याकुळतेनं व्यक्त केली आहे. त्याबरोबरच या प्रश्नाची निरुत्तर करणारी जटिलता तशीच कायम ठेवण्यात वास्तवाचंही भान सांभाळलं गेलं आहे. या प्रणयी युगुलाचा हा संवाद पहा :

' तरी तू आलीस
विझण्यासाठी की विसरण्यासाठी ? '
' बुंध्यापासून कशाला हलवतोस ?
विझू दे, तुझ्याच अंधारात '

या अगतिक, करुण उद्‌गारात हे विझणंही उजळतं मनात. अशा विपरीत, निराशाजनक अनुभवानं या कवितेतलं मन मोडून पडत नाही. अगतिकतेच्या भावनेनं त्याला ग्रासलेलं नाही. आपण कुणाची तरी शिकार आहो. एक 'रेनडिअर' आहो— भक्ष्य आहो, हे कळूनही, भक्ष्य होताना, शिकार होताना त्याच्या डोळ्यात 'एक सूर्यगर्भ रेनडिअर' आकारतो; आणि अशा अतूट विश्वासामुळं निरवानिरवीच्या क्षणालाही त्याच्या 'हुंदक्यात इंद्रधनुष्य दाटतं' 'इदम्' आणि 'अहम्-आत्मा' (सर्जनशील अहंकार) यांचं द्वन्द्व, वास्तव आणि कल्पित यांच्यातला संघर्ष, नाशवंत वास्तवाचे झगझगीत प्रखर सहस्र किरण आणि आत्म्याचा सनातन काळोख, यांच्यात चाललेलं समर याचं चित्रणही हा कवी भेदकपणे करतो. प्रकाशानं काळोख झाकळतो काय ? माहीत नाही. पण त्यानं निरभ्र शांतता लाभत नाही, हा सूक्ष्म अनुभव, शांती शोधणाऱ्या अंतर्मुख मनाला व्यथित करतो हे मात्र खरं.

अशा प्रकारे गूढ, आत्मनिष्ठ अनुभवांचा फुलोरा फुलवणारा व त्यांना जपणारा हा कवी सामूहिक संघर्षशील जाणिवेलाही

पारखा नाही, हे 'आता या देशात' या कवितेमधून जाणवतं. आणी-बाणीतल्या राजकीय व सामाजिक कुचंबणेचा त्याला संदर्भ असला, तरी अन्यायाविरुद्ध चाललेल्या अनादी मानवी प्रतिकाराचं परिमाण त्याला लाभलेलं आहे. पाठीवर सूर्याचे ठसे घेऊन चालणाऱ्या आणि भुकेनं संतप्त झाल्यावर आपलीच अंडी खाऊन टाकणाऱ्या मुंग्यांच्या प्रतिमेतून केलेला राजकीय कार्यकर्त्यांचा उपहास विदारक आहे. जुलुमाला आवतणं देणाऱ्या अगतिकतेची व दुबळेपणाची चीड त्यात प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. वेदनेला दिलेली उपहासाची डूब परिणामकारक आहे.

हे सर्व अनुभव गाठीशी बांधून शब्दांचं प्रस्थान ठेवणारा हा कवी वाट्याला येणारी आपली वाट प्रामाणिकपणे चालतो आहे. वास्तवाचं भान त्यानं सोडलेलं नाही. अवास्तव अपेक्षाही त्यानं बाळग-लेल्या नाहीत. प्रवासयात्रेला निघालेले हे शब्द गुणाढ्याच्या साहित्याची राख आपल्या रक्षापात्रात गोळा करण्याच्या उद्देशानं निघाले आहेत. कवी त्यांच्यासंबंधानें म्हणतो,

> 'प्रस्थान ठेऊन शब्द निघाले
> नुकतेच,
> रक्षपात्र घेऊन
> गुणाढ्याच्या दिमतीला'

वैदिक भाषेच्या अभिमानानं पक्षपाती, उद्दाम झालेला प्रतिष्ठा-नचा राजा सातवाहन यानं पैशाची भाषेतला गुणाढ्याचा बृहत्कथा हा मौलिक ग्रंथ स्वीकारण्याचं नाकारलं. ह्या अपमानानं दुःखित, संतप्त झालेल्या गुणाढ्यानं आपला तो महान ग्रंथ अग्नीला अर्पण केला. अप-

मानाच्या, अन्यायाच्या ज्वालेत दग्ध होणाऱ्या गुणाढ्य साहित्याची राख सांभाळण्यासारखं कार्य जरी आपल्या शब्दांना करता आलं, तरी आपली कविता कृतार्थ झाली असं हा कवी मानतो. त्याची तेवढीच अपेक्षा आहे. प्रत्येक काळात आपल्या वाङ्मयाचा होम मांडण्याची वेळ लेखकावर येते. अशा प्रसंगी ती राख वेचून तिचं रक्षण करणं हे कार्यही महान ठरतं. त्यालाही एक मोठं धैर्य लागतं. असा उदार व सेवाभावी दृष्टिकोण ठेवून, निष्ठेनं वाटचाल करणाऱ्या कवीचा भविष्यकाळ उज्ज्वलच असेल. त्याची ही वाटचाल सफल व्हावी, त्यापेक्षाही ती निर्भय व्हावी, अशी शुभेच्छा हे प्रस्थान ठेवताना, मी व्यक्त करतो.

वा. रा. कान्त.

मुंबई, १–१०–७७

## अनुक्रम

१. पृथ्वीला स्तनपान

२. झिंग

३. कविता

४. प्रस्थान

५. मुक्तीचे क्षण

६. मोहळ

७. सकाळताना

८. सारेच ढग निमित्ताचे

९. रक्तातील कमळ

१०. पावसाची फांदी

११. अश्वमेध

१२. गर्दीच्या तळघरात

१३. खिडकीतल्या फांदीवर

१४. अंजु आठल्ये

१५. अश्रांची दिठी

१६. तुझे उसवलेले आकाश
१७ एक बागुलबुवा
१८. शब्दांचा मेणा
१९. प्रकाशराईत
२०. दोन कविता
२१. फ्लेश्
२२. नक्षत्रांचा समुद्र
२३. इदम्
२४. मरण गुहा
२५. मन
२६. प्रश्नांकित अंधार
२७. ती : एक अंधार
२८. आता या देशात
२९. निंबोणीच्या झाडावर
३०. तळ नसावा

## पृथ्वीला स्तनपान

माझ्याच पौरुषाची ना ही फळे सूर्य चंद्र
मी पणात, त्यांच्या शुक्राचे आहे तेज मंद

माझ्याच आदेशावरून प्रसवतात दिवसरात्र
प्रसव वेदना भोगीत आहे आकाश विचित्र

मीच तो ओंकार करणारा पृथ्वीला स्तनपान
तिच्याच रोमारोमांतून रूजत राहतात मृद्गान

कणाकणांत विस्तारतो अथांग नव अश्वत्थ
माझ्याच धमन्यातून वाहतो जीवनरस प्रमत्त

याच अश्वत्थावर बसलेली ही वटवाघुळे
अजून बसली आहेत, खात आपल्या विष्टेची फळे

## झिंग

कोकिळेची कूक
मन होई वेडे
मला आहे वेढून
दूरचे एक खेडे —
पावसाची झिम्‌झिम्
लावण्याची झिंग
उन्मुक्त स्तनावर
चंद्र होतो चिंब

# कविता

घनन् घनन् घनछंद बरसती
माझ्या वसुधातली
झरले झरले दहीवर बिल्वर
लखाक पुष्पावरी
कोण सुंदरी अवचित येते
माझ्या हृन्मंदिरी ?
कशी चमकते घनतिमिरी ही
सप्तरंगी यामिनी
लेवुनि कुंडल मोरपिसांचे
लक्ष लक्ष दामिनी !
निर्झर निर्झर गाणी गाती
नुपूर बांधती पदी
कांचनमृग हे चौखूर पळती
नादांच्या या तृणी
अनंग रंगी फुले विहरली
मधुरगंध पर्वणी
रम्य उभी ही कविता-सविता
तेजाच्या तरूतली !

## मुक्तीचे क्षण

स्मृतींच्या वडाखाली
नांगरून उभी
एक एक आठवण,
श्वासाचा वास
घुटमळतो लिंगदेहात

असा अंधार अघोर समुद्र
झेपावतो माझ्या आकाशात.
वाऱ्याला तरी
कुठे चाहूल आहे ?
मंथनातील बावरल्या क्षणांची.
ते कासाविस होतात
ओढाळ नजरेत.

भरतीची तसदी
आटून जाते पापणीच्या प्रतिक्षेत.
गळा दाटून यावा
तसे मुक्तीचे क्षण
वांझ होत गेलेले.
आठवणींच्या गजाआड
फक्त फडफड
अभिशप्त अंधार उभासोट

उजेडाची पावलं

पुसट होत गेली
संधि प्रकाशात.
भविष्याच्या वाटेवर
संदर्भ शोधीत
मन दुभंगून गेले,
सूर्यास्तात.
जागी होते
माझी संध्याकाळ
जास्वंदीवर पानागणिक
चिमण्यांच्या कोलाहलात.

## मोहळ

कुठल्यातरी तरी प्रचंड दरीत
असावा एक उत्तुंग वृक्ष
या वृक्षावर लटकलेले
मी पाहातो एक मोहळ
उलटे टांगलेले,
आभाळाच्या वक्षावर
घोंगावणाऱ्या त्या मधुमक्षिका पाहिल्या
की माझ्या अंतःकरणात
जळते एक काहूर
काळाची घेऊन हुरहूर,
कुठेतरी मी पिग्मीसारखा
प्रचंड खोलीत
तरंगतो
एक पाचोरा बनून !
पण मधुमक्षिकांच्या
शत शत कपाटांतून
झरत असतात ना
दरीत मोहाचे गंध !
माझे पाय अडखळतात
ऐलतीर पैलतीर
आभाळ आऽवासून पाहात असते
मनाची भिरभिर,
सूर मारून

एक प्रचंड घार
धारदार नखाग्रांनी
उगाच माझ्यावर
झेपावत असते.
आभाळ पाठीवर घेऊन,
सदा सर्वकाळ
खळखळणारे झरे
काळ्या पत्थरातून
वारावणारे तुषार
इंद्रधनुचे हर्षभार
पेरीत असतात गर्दतार
माझ्यातल्या धमन्यातून
पेटत असतो शीतांगार.
वाऱ्यासवे उडून जावे
अंग टाकून नेत्रापार
मोहळातला मध उरेल
ओठावरती हिमगार !

## सकाळताना

शब्द शब्द स्पर्श झाला ओठावर मोना
चमकीतील हिरवा खडा लाख गोंजारताना.
गार पाऊस अनावर पदर सावरताना
हिरवा चाफा गोरामोरा मध टिपताना
हास्य तेव्हा फेसाळते चंद्र कोरताना
चंद्र तसा बिलगतो सूर मारताना
शिंप शिंप मोती झाले शहारताना
सूर्यबिंब ओठी आले सकाळताना

# सारेच ढग निमित्ताचे

सारेच ढग निमित्ताचे
जरतारी
पाखरपंख भरजरी
आकाशललाट खंतकरी
या ललाटाला नसते
आपुली रंगरेषा
जो तो जुळवून घेतो
नसलेल्या रंगरेषा
'मी' 'तू' च्या आर्ष भाषा
व्यथेची चढण
समाधानाचे उतार
उतरता उतरता
धास्तावलेले मणके
काळोखाचे आमंत्रण स्वीकारतात
मग बोटभर चिंधीतील
व्रतवैकल्याची मिरास घरंगळते
श्रद्धेच्या बुरशीवरुन !
सोडून कुणाची तरी करंगळी
रमणीय ओनॅसिस्
पॅसिफिकला वळसा देऊन गेली
तरी परतते
गोरजमुहुर्तावर,
चित्कारलेले भयाण क्षण घेऊन
मग चंद्राचा सुकाणु

निखळून पडतो
आकाश पेल्यातील
द्राक्षे वेचता वेचता
आपण म्हातारे होतो
सुरकुतलेला समुद्र
फक्त असतो साक्षीला
स्वतःला न समजणारा
आखात आखात सूमाट पळणारा
बुडबुड्यासारखे ढग उडवून
चराचर बुडवू पाहातो
चक्रम,
लाटांच्या बाहुतील बळ संपल्यावर
काळोखाचा मळवट भरुन
एका अंधार गुहेच्या वाटेवर
आपण
'क्यू' मध्ये उभे असतो
पाखरपंखांची वाट पहात.

## रक्तातील कमळ

माझ्या रक्तातील
कमळांचे देठ खुडून
माणसा माणसातील चिखलाला
मी सजवतोय
त्यांच्या भाडोत्री तर्कशास्त्राला
कधीही फुले येणार नाहीत
त्यांच्या दिवाणखान्यात
एक कुत्री बसलेली असते
फिडलवर गाणे गात
तिचा सूर लागला की
बंगला नाचतो
खिडक्यांच्या पडद्यावर
घडीबंद स्वप्नांची चित्रे
रेखाटली आहेत
मेणबत्त्यांच्या प्रकाशात
त्यांची नजाकत
वितळत आहे स्तनांच्या गाभाऱ्यात
हा यमन राग कशाला आळवतो ?
मूर्तीचे रंग का कोळपले ?
बुब्बुळातून हे डांबर कशाला ठिबकते ?
स्वतःच्या आत्म्याला सोन्याचे अस्तर लावू नका,
हा आकाश दृष्टीचा पुंजका
भस्मसात करील
काचेच्या तावदानावर कोरलेले आत्मे

त्यांचे उर का बडवता ?
या लालबागेतील फुले
आता पिवळी पडली आहेत
त्यांच्या नसा सुकल्या आहेत
जुगार खेळायला
उरले आहेत फक्त डोळे
तुझे खोटे हात
किती दिवस लपवशील
हातमोज्यात ?
शब्दांची पोती भरून
जगाला सांगता येणे कठीण का आहे ?
एका अस्वस्थतेत
आत्म्याचे लाकूड होईल
काष्ठवत झालेल्या
ओठांच्या घडवंचीवर
झोकदार शब्दांना
आता जागा नसेल
इथल्या उंदरांनी
कुरतडलेल्या जगात
माणूस नावाचा प्राणी हरवला आहे
प्लेगच्या पिसवा बनूनच
त्याला शोधावे लागेल
गोंदशील का माझ्या कपाळावर
ब्रह्माचा लेख

उद्याच्या सूर्यासाठी !
छापून देशील
माझी मेंदीची पावलं
आभाळाच्या चिंधीवर
माझ्या जखमांना
निवडुंगाचे कुंपण घाल
त्यांच्यावर एक रोवून ठेव
माझ्या रक्तातील कमळ
उद्याच्या चंद्रासाठी !

## पावसाची फांदी

पावसाची फांदी
वाऱ्याचे घुंगरू
लढत लढले
पदराशी शिंगरू !

## अश्वमेध

त्या दिवशी झाडे कशी गपगार होती सर्वगात्र
पण तो हसला होता श्वापदासारखा अपरात्र
तेव्हा सूर मारीत एक चांदणी खाली आली
माझ्या डोळ्यांच्या दिवेलागणीत
आणि रात्र निघून गेली निमिषार्धात
तसा देहाच्या कफनीतील जीव जखडून गेला
संज्ञाप्रवाहांच्या निऑन लाटेत
ओठावरला शब्दांचा अवधूत
कृष्ण काळोखात चित्कारला
शरीरातील सर्व जागर थिजून गेला देठाच्या मुळाशी
विजेची घनगार दीप्ति पापण्यांच्या बुडाशी विरघळून गेली
सनईचे सूर मखमखलीत सळसळले विळखा उसवताना
विकत घेतलेला अश्व तालेवार खिंकाळला
आत्म्याचे लगाम तोडून
ती तारका निखळली ध्रुवाला शापून
कुर्बानीचे दान हसले क्षितिजावर
एका रेशीम देहावरील मुद्रांकित तुफान
आल्या वाटेने निघून गेले
वरातीमधील घोडा एका अश्वमेध यज्ञात
मरून पडला आहे

## गर्दीच्या तळघरात

१.
डोळे भरून
उरलेला काळोख
त्यात स्पर्श किणकिणलेला
त्या आर्त रात्री,
अंधारालाही फुटला होता
शब्दातीत नकार
२.
पूर्वपरंपरेनुसार
संसाराचे कलम करून
हयातीतच
उपकाराचे ढोल बडविण्यासाठी
कातडी सोलली
जन्मदात्यांनी !
३.
गर्दीच्या वारूळात
त्या सर्पसत्रातून
मुक्त होण्याची धडपड
व्यर्थ होती
माझ्या आत्म्याने
केव्हाच पिसे गाळली होती
गर्दीच्या ब्रह्मांडाला थोपविण्याचे सामर्थ्य
झडलेल्या आत्म्याला कुठे होते ?
भविष्यात जळणाऱ्या

माझ्याच प्रेताची घाण यायला नको होती अकालीच.

४.

उत्तरे सापडण्यापूर्वीच
रात्र उलटायची
मग मी जरीमरीच्या खेळातला
आसूड घेऊन
आपल्याच पाठीवर
मारीत सुरे
तेव्हा गर्दीचे डोळे
चक्रावून जात
वेदना गोठून गेल्या
की स्पर्श विटून जात

५.

त्या सातूच्या पिठात
लोळलेले ते मुंगुस
त्या आर्त रात्रीपासून
असे घाईघाईने
स्वप्नात का येते ?
अनुत्तरित स्वप्नासारखे

६.

गर्दीचे तळघर अजून भेडसावीत आहे.
मी शोधतो आहे सावली
त्या तळघरात बेचैन आत्म्याची

## खिडकीतल्या फांदीवर

रान कसे हिरवेगार
उलू उलू जागर
खिडकीतल्या डोळ्यांचे
मन झाले गजर

खिडकीतल्या फांदीवर
टुकूर टुकूर नजर
ओठातल्या गाण्याला
मन झाले पाझर

लाल काळी करवंदे
आली कशी फुलून
पानांच्या काचोळीत
मेघ आले भरून

रान झाले सैरभैर
दार म्हणे उघड
चांदण्यांच्या तालावर
झिम्मा खेळू फुगड

## अंजु आठल्ये

अेक आहे अंजु आठल्ये
पोरे म्हणती कुणाला गाठले ?
तिची पोरे आहेत थोर
आम्हांला मात्र उगाच घोर

हनुवटीच्या शतधा कुरवंड्या
जेव्हा ती ओवाळून टाकते
तेव्हा माझे मन फिटते

ती घेते एकेकाला
डोळ्यांच्या लंब वर्तुळात गोठवून
मग सारे चमकतात गुलाबी चेक वटवून

नुसत्या मानेची गिरकी
घेते सर्वांची फिरकी
लाडे लाडे बोल
मी कसा शिणवू तोल ?

जेव्हा का ती हसते
तीच स्वतः फसते
नको ते हरवून बसते
अशी ही अंजु आठल्ये

## अभ्रांची दिठी

कणसाच्या ओटीपोटी
वाऱ्याची मस्त मिठी
शेतावर भुलून आली
अभ्रांची नम्र दिठी

## तुझे उसवलेले आकाश

तुझे उसवलेले आकाश
आणखी कुठवर उसवणार आहेस ?
की हेसुद्धा एक सेल्फ अनॅलिसीस् ?
आकाशाची कित्राडे बंद करून
गर्द राईतील हा अज्ञातवास
नाही का संपविता येणार !
अनंत काजव्यांनी लखलखणारी स्वप्नराई
डिस्‌इन्‌टरेस्टेड !
डोळाभर सूर्य
तुझ्या ओटीपोटी धुमारलेला
अंगभर सकाळी !
आठवणींचा डंख
काजव्यांचे टीपण
अंधारगर्भातील वितृष्ण !
सावलीचासुध्दा एवढा ळळा असतो ना !
ती इम्मॅच्युअर रात्र मुजोर श्वासात
तडफडलेली कविता
चंद्रासारखा एक पारवा
भेटला होता तुला
निरोप देण्याच्या द्वैत क्षणाला
नक्षत्रांच्या डहाळीवर
मीपण पणाला लावून तू दुभंगून गेलीस
मग राहिल्या फक्त निरोप घ्यायला
विझलेल्या मशाली

तू पसरत गेलीस
तरंगासारखी एका आवेशात यमुना जळात
आणि स्त्रीच्या स्नानासारखी ती संध्याकाळ
अशी मोकळी ऽ ऽ मोकळी ऽ ऽ होत गेली
पौर्णिमेला स्वप्न पडावे तशी
अंगभर ठुसठुसलेले तुझे गर्भाधानाचे दिवस
ओठावर अडलेले
ओठाशी झोंबणारी जेट स्ट्रीम तुला आवडते
त्यावेळी त्याने खोचलेले तुझ्या खोप्यातील सोनार मोरपीस
किती छान दिसायचे
तेव्हा ढगांचे चिनार झालेले असायचे
तू जोवर शब्दांत होतीस ना
तोवर आश्विनातले ऊन नकोसे वाटायचे
वाटायचे,
सूर्याचा गुलमोहर तुझ्यात उतरला असावा
रेशीम धारांचे मनस्वी अॅनॅलिसीस्
तुझ्या शरीरावरून ढळणारे
कडवट अंधारावर आकाश लुकलुकणारे
श्मशानजागर मनात
आता सावलीचे कोंदण
उभे आहे स्वरविद्ध !

## एक बागुलबुवा

एक दिवस आला
वळवाचा पाऊस
त्याचे नाते
फक्त गारांना ठाऊक

एक दिवस आला
एक बागुलबुवा
घेऊन गेला कसा
गालावरचा खवा

## शब्दांचा मेणा

बांधला होता तेव्हा
शब्दांचा मेणा
पहाट अस्वस्थ
भोई उदासवाणा

गलबलले अंतराळ
तालसूर विस्कटला
सूर्यफूल विकसले
देठ कसा घुटमळला ?

चिंबचिंब भिजलेला
मेघ होता भाळी
आकाशीच्या पारंब्या
सूर वरखाली

आठवले आकंपन
कंठातले भारी
मेघ मग उतरले
न्हाणवलीच्या गाली
रान कसे थरथरले
रोम राई राई
अशी कां झाली
प्रतारणेची घाई !

भोईच्या नेत्रामध्ये
उन्हे लाही लाही

## प्रकाश राईत

१.

तेव्हा पहाट झाली होती
धुक्याची शाल पांघरून
प्राक्तन निघाले होते
तांबडे फुटू लागले तेव्हा
अस्तित्वाच्या निषेधाचा
एक चित्कार उमटला
पंचमहाभूतांच्या योनीत

२.

प्रकाशाच्या पाखरांनी
गोंदवून ठेवले
पानापानांत चिमणे बोल
तशी दुडदुडली
इवलीशी पावले
प्रकाश राईत

३.

स्वप्नांची सावली घेऊन
खूप दूरवर येऊन ठेपलो
एका कडुनिंबाच्या वाटेवर

४.

पावलांना मुक्काम ठाऊकच नव्हता
माणसे भेटली,
आंधळी,
तारांगण न पाहिलेली

ती चालत होती
खेकड्यासारखी
डेंगे उभारून

५.

अस्तित्वाची पखाल
खांद्यावर घेऊन
मी चालत आलो
निंबोणीची वाट
माणसांसारखे
दगड भेटले मैलांचे
सोबतीला ते बरे
त्यांना चोच नसते
गिधाडांची
उन्हात
ते सामर्थ्य देतात
मुक्कामापर्यंत
पावलागणिक

६.

दूरवर दिसणाऱ्या टेकड्या
रापलेल्या संन्यस्त,
संन्याशाच्या स्वप्नासारख्या,
त्या स्वप्नांना
लिंबोण्या लोंबत होत्या.

७.

छद्मी शहरापासून दूर,

छद्मी वाऱ्यापासून दूर
छद्मी घरापासून दूर ऽ ऽ

८.

आता गंगेवर
संन्याच्या येण्याला
केवढा अर्थ होता !
त्या भाविक भाविणीने
फुलांची ओंजळ
पसरून ठेवली पदचिन्हावर
फुलांची पावले
मागे ठेवली तिच्यासाठी,
वाळवंटाची वाट तुडवीत असताना
विकल्प नको म्हणून
स्वप्नभंग करतात कधी कधी
ती छद्मी फुले
मग मी रिते करतो
माझे भरलेले आकाश !

९.

धुपारलेला वारा
थकला तरी येतो मागोमाग
चौफेर वाळवंटात
वाऱ्याचे मोहोळ उठले की,
आठवणींचा लमाणतांडा
अकारण सोबत करतो
छे !

हा चंद्र
माझ्या झोळीत कशाला ?
अंधाराच्या आवर्तात
दिशा वितळून गेल्यावर !

१०.

ती उल्का
सूर्यस्नान करून
निघाली स्वयंसिद्ध
स्पर्शाच्या फुलवेलीत
रंगण्यासाठी,
पण
धुमार फुटला नाही

११.

आता
लिंबोणीच्या वाटेवर
उभा आहे
परिदग्ध
विदग्ध उन्हात !

## दोन कविता

१.

तुझ्या प्राक्तनातून
उदेलो मी
जडाच्या भिंती तोडून
टाकीन कसा
घेतला वसा
मातीत रंगल्या रेषा पुसून !

२.

तृप्तीचा ढेकर देऊन
जेव्हा होशील कृतार्थ
एकदाच थरारेल
क्षणातील परार्ध !
पेटतील कुठेतरी
झडलेल्या अस्थींच्या
प्रस्तरातील आकांक्षा
पिचलेल्या मुष्ठींच्या !

## फ्लेश्

१.

बसलोय एका हॉटेलात
वासनांची थोटकं चिवडीत
अंगावरून जाते
लपक झपक
सार्वजनिक चौकातील
हिरवी मासोळी
दरवेशांच्या हातात
या अस्वली राहिल्या नाहीत
'कोणीतरी ताईत द्या हो, ताईत
लिंगावर बांधायला'
ह्या हिरव्या अस्वली
सैराट होऊन
आत येताहेत
त्यांची लुच्ची गात्रे
सिगारेटच्या धुरात
पसरट झालेली पाहातोय,
गुलाबी !
नको,
इथे तरी स्वस्थ बसू द्या हो,
इंचभर × × × तुकडा
फ्लड लाईटमध्ये किती दाखवाल ?
या देहाची भूतं

भेडसावत आहेत
पियानोतील स्वरासारख्या
या पोरी,
देहधारी वाझं !
वासनेचे खंदक खणणाऱ्या वानरानो,
या स्क्रिनच्या पलीकडे पहा,
रंगात पेटलेल्या
इनस्टंट मशाली !
एक सुरी हवीय
आसमंताचा नाळ कापायला
या ॲक्वारियममधील पाणी
कुणीतरी बदलायला हवंय
अयाचित वासनांच्या किरणानो
असं का ओरबाडताय् ?

२.

फ्लेश
एलिफंटस् फ्लेश्
वासनेच्या वेलीवर
एका उत्सवानंदातील
आकाशाकडे नजर लावून
ओरबाडीत आहे
अंतर्बाह्य आक्रोश
वासनांची ही अडगळ
फुंकून टाकली असती,
पण एका ठिणगीने

त्रस्त का व्हावे ?
भोवळणाऱ्या वासनेत
कलिंग होऊन पेट घेते
रात्रीचे एक नृत्य
वासनेच्या पिपाणीत
वारा फुंकून
असं का करता विवस्त्र
रक्तातील तांबड्या पेशींना !
पुरे का
हा 'जिऑलॉजिकल टिडिअस प्रोलॉग
फम्बलिंग वुइथ ब्रेस्ट '
द्राक्षांच्या वेलीवर
गोठून गेलाय रक्तबिंदू
त्यांना दिसतायत
स्तनांच्या मुद्रा
या अंधारमायेत !

## नक्षत्रांचा समुद्र

पिंजलेल्या ढगांसारखे
ते दिवस गेले
पुढे तूही निघून गेलीस
आठवणींच्या सरी मागे ठेवून

आज तू कवेत नसताना
आठवतो शायलॉकचा
नक्षत्रांचा समुद्र !

मी मात्र शोधीत आहे
माझ्याच सावल्या
काळसर्प
यमुनेच्या डोहात
स्वतंत्र !

१.

रेनडियरच्या शिकारीनंतर
आकाश अंधारून आलय्
आलय् उधाण वाऱ्याला
भेदरलीयत्
चिडी चिप झाडं
उगवल्यायत
ठायी ठायी
कुत्र्यांच्या छत्र्या
पांढऱ्या अस्वलांच्या देशात
अंधार वाढत चाललाय्
तुफान मस्तीत
अस्वलांनी
धारण केलीयत्
मस्तकावर भूछत्रे
वाऱ्याची दिशा चुकविण्यासाठी
हा सप्तर्षीचा तांडा
त्यांना दिशा दाखवतोय
पिवळा पडलाय तांबडा लाल सूर्य
मृत रेनडियरच्या कुशीत
त्यांच्या अस्थींची
पालखी सजलीय
चांदीची पालखी
सोन्याचे खूर

पालखीचा गोंडा
झुलतोय झूल,
पालखी चाललीय्
अभिजात सनईच्या सुरावर
२.
पांढऱ्या अस्वलांच्या स्मृतीत
खेकड्यांचे कानून
टाचून ठेवलेयत्
जमान्याच्या दरेक कुशीवर
नेमस्तानी छापलीयत्
स्वतःची झडलेली पावले
याच पावलावर खूर विसावतायत्
परजतायत्
रेनडियरच्या अस्थींची शस्त्रे
इथल्या भूतयोनी
३.
पालखीचा गोंडा
माखलाय रक्ताने
४.
अंधाधुंद अस्वले शोधतायत्
पालखीतल्या अस्थी
आता दिसतोय त्यांना
पालखीवर बसलेला
आंधळा ससा
५.
त्याला हवेयत्

दोन डोळे
एक दाहक
अन् एक शीतल
अणुपरमाणुंच्या अवकाशात
सहस्त्र पाकळयांच्या
त्या कमळावर रोखलेले

६.

लक्तरांचे बळून
झेपावतायत् पुढे
स्मृतीतील तर्कांच्या
भिंतीना मागे टाकून !

७.

अभिजात अस्वलांना
हे नकोय्
नकोय् प्राक्तनाची उरफोड व्हायला
नकोय्
स्मृतीतील वाघनखे उघडी पडायला
त्याना हवेयत् पालखीचे खूर
तंबूच्या खुंट्या बळकट करायला
ते गुलाल उधळतायत्
वेशीवर
वाळलेल्या रक्ताचा

८.

गारठलियत् सारी दिवास्वप्ने
ते निघालेयत्

जग पादाक्रांत करायला
एका बेड्रूक उडीत

९.

स्थावर जंगम भूतयोनी
स्थिरावल्यात
काळोखाच्या किनाऱ्यावर
भैरवाचे आवर्त आकाश
झगमगलेय्
एका सान्त नीरवतेत
प्रसुतीच्या संवेगांची
सकाळ येतेय्
आणि
आकारतोय्
सूर्यगर्भ रेनडियर
इदमाच्या सहस्त्र रश्मि
झाकोळतायत् अहंचा काळोख
युगायुगाचा,
नीरभ्रतेसाठी !

## मरण गुहा

हुंदक्यात आयुष्य दाटले आहे
निरवानिरवीच्या क्षणाला
उगाच स्फुंदत या खडकावर
काय लावणार आहेस पणाला ?

द्रौपदीची पिले खाली घुबडाने
शाप काय बाधणार आहे सरणाला ?
अशीच उलटणार आहे
फाशांची मयसभा एका क्षणाला

हे जीवन एक मरण गुहा
नित्य नूतन पर्णाला
म्हणूनच ना पाने भितात
दवात भिजणाऱ्या शिशिराला !

हुंदक्यात आयुष्य दाटले आहे
निरवानिरवीच्या क्षणाला !

## मन

मन जिप्सी
बिलोरी घागरा
माळरानावर
वारा चावरा

मन जिप्सी
अजब कारा
गंधरस
वर्षाधारा

मन जिप्सी
गंध पक्षी
अंधार भटकतो
कोरीत नक्षी !

## प्रश्नांकित अंधार

निगूढ अंधार
उदंड यात्रेतला
आकाश वाकलेले रातांधळे
डोळ्यांतले चांदणे विझलेला मी
चाललो आहे शेवाळल्यागत
डोळ्यांतली आरास हरवून
त्या संध्याकाळी तू आलीस
पेंगलेल्या अंधारात
मी आसवे पुसणार कसा ?
हात पोचणार कसे ?
हात तोकडे की पुण्य तोकडे ?
धरली असती भागीरथी मस्तकावर
आसवांची !
पण मस्तकच कपाळ करंटे
तरी तू आलीस
विझण्यासाठी की विसरण्यासाठी ?
प्रत्येकाला आपापला भूतकाळ
प्रिय असतो
बरा वाईट !
तू म्हणालीस,
'बुंध्यापासून कशाला हलवतोस ?
अखेर विझू दे तुझ्याच अंधारात'
या अंधाराकडे मी पाहात होतो,
तुझी सावली किती तरी मोठी झालेली

वेदनेची साय तुझ्या ओठावर पसरून
मी
निघालो आहे
किती तरी किलोसायकल दूर !

## ती : एक अंधार

ती :
निष्क्रिय तर्कपद्धतीला झुगारून
एका धर्मसंकेताला उत्रवीत
गणिका होत गेली
दरेक श्वासागणिक
अस्तंगत सूर्याबरोबर
: तिचा स्वभावच तो
प्रथम अंधार उभा करायचा
अंधाराचे अर्घ्य द्यायचे
प्रत्येक पुरुषाक्ताला
मग ओरबाडायचे स्वतःला
नासवून गेले
सारे करबंध
अंधार उपसता उपसता
नसांच्या त्या उत्खननात
सूर्यफुले ही दिग्भ्रान्त झाली
अंधाराचा नितळ कातळ
फुलत गेला मोहळ उठवीत
मनाच्या लाहीत

22995
काव्य 2332

## आता या देशात

आता या देशात
लोक एका अज्ञात रोगाने
मरू लागले आहेत
तुम्ही वाचले असेल हे
—असे म्हणतात,
या देशात
टू-बाय-टूचे घर
फक्त काही रुपयात मिळते
रस्त्यावर, लाखेचे !
एखाद्या हायवेच्या काठावर बसून
रामप्रहरी
मलविसर्जन केले तरी चालते
आजच्या धकाधकीच्या या काळात
शरम वाटण्यासारखे
त्यात काही नाही
कान असून ऐकायला नको
डोळे असून बघायला नको
आणि हो,
हेच बरोबर आहे
नाही तर आज अज्ञात रोगाने
माणसे मेली नसती,
उद्याचा धन्वंतरी
शोधून काढील,

तो रोग म्हणजे
केवळ एक भूक !
जी काल ही नव्हती
आजही नाही
उद्याही नसेल
या शोधाबद्दल
त्यांच्या राज्यात
त्याला नोबेल पारितोषिक मिळेल
किंवा एखादी पद्मश्री !
बाकी या ××× लोकशाहीत
कुणाला काय हवे आहे ?
भणंग वाऱ्यासारखी माणसे
आज वाऱ्यावर का उडताहेत !
--ही मुंग्याची केवढी रांग
कुठवर जात असेल ?
कशाच्या शोधात ?
त्यांची अंडी पण
त्यांच्याबरोबर आहेत
आध्यात्माच्या यात्रेला निघाली असेल
की पुण्यशील भुकात्मे,
गतजन्मीचे निर्वासित ?
ते पहा,
त्यांच्यात आणखी
काही येऊन मिसळताहेत
करपलेल्या त्यांच्या पाठीवर
सूर्याचे ठसे स्पष्ट दिसत आहेत

सूर्याचा झगझगीत उज्वाड सोडून
आत्म्याच्या मशाली पेटवून
निघाले अंधारातून !
पण हा सारा जथा
मागे कां बरं फिरला ?
त्यांच्या स्वप्नातला तो ऐरावत
समोर आला काय ?
एखाद्या इम्पाला कारमधून,
त्यांच्या स्वागतासाठी ?
एक अनौरस
सर्वांचा बाप
नसेल
ही तर राणीमुंगी असावी
सर्व भोगून उरणारी
आणि तिचे हे पुढेमागे
थुंकी झेलणारे हुजरे
अरे !
ही तर एक सभा सुरू झाली
फोल्डिंगच्या रंगमंचावर
राणीमुंगीने प्रचंड हातवारे केले
त्या सर्व भुकात्म्यांनी
आपलीच अंडी खाऊन टाकली
संतप्त होऊन
ते अज्ञात भुकात्मे
नियतीच्या दिशेने चालले आहेत

या, माझ्या पावलांचा वास घेत या,
मुक्तात्म्यांनो
या
असे माझ्या मागून या !
मी तुम्हांला ती कोठारे दाखवितो,
असे भूकबळी जाण्याचे कारण नाही
इथला प्रत्येक बातमीदार
आपले लिंग
सरकारी बँकेत
गहाण ठेवून आला आहे ?
इथला प्रत्येक टी. व्ही.
भगोष्ठाचे चित्रिकरण करण्यात
रंगला आहे
तुम्ही त्याची वाट पाहू नका
उद्याच्या सकाळपर्यंत
तुमच्यातील एक जरी उरला
तरी पुरे आहे
मेलेल्यांची विष्टा चिवडीत
बातमीदार येतील मागून
मी मरणाचा क्रूस
माझ्या पाठीवर घेतला आहे !

## निंबोणीच्या झाडावर

निंबोणीच्या झाडावर
बसली होती चांदरात
माझ्या दारात चांदणे,
पडले होते घनदाट

सलत होता आत आत
जीवघेणा शांत ताप
अशी येते अशी येते
वेदनेची गुळणी आत !

कितीदा मी आठवावी
खुळी तुझी कल्पना
तीव्रतर होते माझी
सलणारी वेदना

चांदणे मनीचे चवचाल
धार त्याची दुधार
ती किमया चंदेरी
चिरीत राहाते चिरकाल !

## तळ नसावा

खोल कुठेतरी डोह असावा
बुडण्याला तर तळ नसावा
अशी खोल जखम असावी
वेदनेला दखल नसावी

22994
का. क्र.
काव्य 2332

REFBK-0022115
REFBK-0022115